सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००४१७–२०१२

## नियमित दिवाणी दावा क्र.११४/२०१२

## निशाणी क्र. २३५ वरील आदेश

प्रस्ततुचा अर्ज वादी क्र.१(४) यांनी मयत प्रतिवादी क्र.१८ यांचे वारस अभिलेखावर घेऊन दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. वादी क्र.१(४) यांनी आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र.१८ हा दि.१९/०२/२०२५ रोजी मयत झालेला आहे. प्रतिवादी क्र.१८ चे विरुध्द दावा अबेट झाला आहे. तसेच प्रतिवादी क्र.१८ चे वारस रेकॉर्डवर आणण्यासाठी विलंब माफ होऊन मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे. सदर प्रतिवादी क्र.१८ चे प्रतिवादी क्र.१८अ व १८ब हे वारस आहेत. तरी सदर प्रतिवादी क्र.१८ यांचे कायदेशीर प्रतिनीधी दाव्यात समाविष्ट करण्यास व तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे.

०४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी सरस निरस वाटप होवुन त्याचा कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०५. सदर कामी नि.क्र.२४३/१ येथे प्रतिवादी क्र.१८ तुकाराम नारायण धुवाळी यांच्या मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी उशिराने दाखल केलेला आहे. अर्ज नि.क्र.२३३ येथे आदेश पारित करुन मयत प्रतिवादी क्र.१८ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब वादी

यांनी खर्चाची रक्कम भरल्यानंतर माफ करण्याबाबत आदेश पारित करण्यात आला आहे. तसेच अर्ज नि.क्र.२३४ येथे आदेश पारित करुन मयत प्रतिवादी क्र.१८ यांचे विरुध्द झालेली अबेटमेंट वादी यांनी खर्चाची रक्कम भरल्यानंतर रद्द करण्याबाबत आदेश पारित करण्यात आला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता, मयत प्रतिवादी क्र.१८ यांच्या वारसांविरुध्द प्रस्तुत दावा पुढे चालवण्याचा अधिकार वादी यांना असल्याचे दिसून येते. तसेच, न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना आणि वादी व प्रतिवादी याच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्त्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## – <u>आदेश</u> –

१. अर्ज नि.क्र.२३५ मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी अर्ज नि.क्र.२३३ व २३४ मध्ये पारित केलेली खर्चाची जमा केल्यानंतर प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे मयत प्रतिवादी क्र.१८ यांचे वारसांना दाव्यात समाविष्ट करावे व १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.09.24 16:40:49 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )

दिनांकः२४/०९/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड